"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]

जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै. वा./०२-०३
पुणे. दि. ५/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

आदर्श विद्यालय, जारकरवाडी.
ता. आंबेगाव

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३
इ. ६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी, इ. १० वी.

आपल्या राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पेरवडा / आदर्श विद्यालय, जारकरवाडी. या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी /~~इ. ५ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २००० - २००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/३१११/२०००, दि.८/३/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी, इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जि.प. पुणे~~ / गट शिक्षणाधिकारी, पं.स. आंबेगाव. यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

Scan
७/८

गटशिक्षणाधिकारी-पं. स. आंबेगाव,
मु. आंबेगाव, जि. पुणे.

J. N. H.
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.